**फौजदारी चौकशी अर्ज क्र. ३२३/२०२३ मधील निशाणी क्र.२२ वरील आदेश**

(सुरेखा अशोक वाळके व इतर वि. अशोक दत्तात्रय वाळके व इतर.)

( CNR : MHAH250030772023 )

अर्जदार यांनी मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (येथुन पुढे संक्षिप्ततेसाठी 'सदर कायदा' असे संबोधण्यात येईल) कलम १८, १९, २०, २१ व २२ अन्वये विविध अनुतोष मिळणेकामी दाखल केलेला आहे. मूळ अर्जाचे कामकाज प्रलंबीत असताना अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सामनेवालाकडुन लग्नात दिलेल्या वस्तु परत मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज अर्जदार यांनी स्वतः करीता व अर्जदार नं. २ व ३ करता सामनेवाले यांचे विरुद्ध घरगुती हिंसाचार कायदा २००५ चे विविध कलमा अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व सामनेवाले नं. १ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्रानुसार दिनांक ०३/०६/२०११ रोजी सौ. शोभाताई रसिकलाल धारीवाल सभागृह, रामलिंग, ता. शिरुर, जि. पुणे येथे अर्जदार नं. १ हिचे आई–वडीलांनी संसार उपयोगी सर्व वस्तु देऊन सदरचा विवाह सामनेवाले नं. १ यांचे सोबत लाऊन दिला होता व तो आजतागयत कायम आहे. सदर विवाह संबंधातुन अर्जदार व सामनेवाले नं.१ यांना अर्जदार नं.१ व २ मुली नामे श्रावणी व ईश्वरी झालेली आहे. अर्जदार यांनी यापुर्वी इंटेरीअम ॲलीमनी मिळण्यासाठी अर्ज दिलेला आहे. सदर अर्ज न्यायप्रविष्ठ आहे. अर्जदार यांच्या आईवडीलांनी अर्जदार व सामनेवाला यांच्या लग्नामध्ये वर्णनयादीसोबत संसार उपयोगी सर्व वस्तु रुखवदमध्ये दिलेल्या होत्या. सदर वस्तु या सामनेवाला यांच्याकडे आहेत. अर्जदार यांना सदर वस्तु या त्यांना दैनंदीन जिवनामध्ये वापरण्यासाठी गरजेच्या आहेत. अर्जदार यांनी सामनेवाला यांना सदर वस्तुची अनेक वेळा मागणी केली असता सामनेवाला हे सदर वस्तु देण्यास स्पष्ट नकार देत आहेत. म्हणुन अर्जदार यांनी वर्णनयादीसोबत दिलेल्या सर्व वस्तु सामनेवालाकडुन परत मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज केला आहे.

३. सामनेवालाने सदर अर्जावर म्हणणे देऊन कथन केले आहे की, सदरची यादी काल्पनीक आहे. कोणत्याही वस्तु लग्नात दिल्या नाहीत व त्या सामनेवालाकडे मुळीच नाहीत. सामनेवाला यांनी अर्जदाराकडुन मिळालेल्या वस्तुची कंपनी व खरेदीची पावती सादर करण्याची विनंती केली आहे.

४ अर्ज व म्हणणे वाचले. सदर अर्जाद्वारे अर्जदाराने तिचे लग्नात संसारउपयोगी वस्तु रुखवदमध्ये दिलेल्या वस्तु ज्या सामनेवालाकडे आहेत त्या तिला दैनंदीन जिवनामध्ये वापरण्यासाठी गरजेचे असल्याने सामनेवालाकडुन परत मिळण्याची विनंती केली आहे. मुळ अर्ज हा महीलांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळणेकरीता अर्जदाराने दाखल केला असुन अर्जदाराने त्या अनुषंगाने नि.३१ वर गणेशगृह वस्तु भंडार, जवळा, ता.पारनेर यांची वस्तुंची पावती दाखल केली आहे. मात्र या स्थितीला सदर प्रकरणात पुरावा बाकी असुन विवाहामध्ये अर्जदारास कोणत्या वस्तु तिच्या आईवडीलांनी संसारासाठी दिल्या होत्या याबाबत पुरावा येणे बाकी असुन या स्थितीला केवळ अर्जदाराच्या कथनाच्या आधारे व तिने दाखल केलेल्या पावतीच्या आधारे सदर वस्तु या सामनेवालाकडुन अर्जदारास परत देण्याबाबत आदेश करता येणार नाही. त्यामुळे या स्थितीला सदर अर्ज मंजुर करता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/-

(डॉ. एन. एस. सबनीस)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.२), पारनेर

दि. १७/०३/२०२६